# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सामान्य प्रशासन विभाग
**क्रमांकः एमएसए/598 दि. 05/10/2026.**
## सूचना पत्र

दि. 27.09.2026 रोजी 11 परिक्षा केंद्रावर घेतलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका फेलो – 2026 या परिक्षेचा सोबत जोडलेला निकाल याद्वारे जाहिर करण्यात येत आहे. यातील प्रथम 151 उमेदवार हे मुलाखतीसाठी पात्र ठरलेले असून त्यांना लवकरच मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखतीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. यास्तव सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवळी पहावे. उमेदवारांनी मुलाखतीस येताना खालील नमूद केलेली कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत आणावयाची आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

1. उमेदवाराने स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, Driving License इ. सोबत आणणे आवश्यक आहे.
2. जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्मदाखला / शाळा सोडल्याचा दाखला / एस.एस.सी प्रमाणपत्र इ. सादर करणे आवश्यक आहे.
3. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा पुरावा म्हणून कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा (किमान 60% गुण) उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. ज्या आस्थापनेत अनुभव घेतला आहे अशा आस्थापना प्रमुखांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमांचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशिप / अप्रेंटीसशिप / आर्टीकलशिपसह एक वर्षाचा अनुभव असलेले प्रमाणपत्र, तसेच पूर्णवेळ स्वयंरोजगार, स्वयंउद्योजकतेचा अनुभव असल्यास अर्जदाराने त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.
6. संगणक विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र.
7. विवाहित महिला उमेदवारांसाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र व नावात बदल झाला असल्यास त्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे / इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह, साक्षांकित प्रतींचा एक संच पडताळणी करीता सादर करणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- 28.09.2026 | सही/- 28.09.2026 | सही/- 28.09.2026 | सही/- 30.09.2026 |
| **प्रमुख कर्मचारी अधिकारी** | **उप आयुक्त (सा. प्र.)** | **अति. आयुक्त (शहर)** | **महानगरपालिका आयुक्त** |